## प्रकरण दुसरे

# तिसऱ्या पिढीतील दलित कविता आणि लोकनाथ यशवंत

## प्रकरण दुसरे

## तिसऱ्या पिढीतील दलित कविता आणि लोकनाथ यशवंत

या भारतीय समाजव्यवस्थेत एका विशिष्ट समाजावर पिढ्यान् पिढ्या अन्याय अत्याचार झाले. समाजापासून विलग म्हणजे बहि:ष्कृत अवस्थेत त्यांना जगावे लागले. रूढी, परंपरा, धर्म, संस्कृती, यांचा दबाव ठेवून त्यांची प्रगती होऊ दिली गेली नाही. मानवी हक्कापासून त्यांना वंचित ठेवले गेले. दिवसभर काबाडकष्ट करूनही जे थोडेसेच मिळाले त्यावरच गुजराण करण्याची सवय त्यांना लावण्यात आली. त्यांच्या कामाचे मोल देणाऱ्याच्या मर्जीवर होते. त्यामुळे त्यांचे दारिद्र्य वाढले. अज्ञान वाढले त्यांना दास्याची सवयच लागली. ते दारिद्र्यात खितपत जगत राहिले.

मात्र डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या रुपाने दलित समाजाला एक नेता मिळाला आणि समाजाचे सर्व चित्रच बदलून गेले. आंबेडकरांनी दलित माणसांना अन्याय अत्याचाराविरूद्ध, लढण्यास शिकवले. शिक्षणाचे महत्त्व पटवून देऊन अज्ञानरुपी अंध:कार नाहीसा करण्याची प्रेरणा दिली. आपण माणसं आहोत माणसासारखे जगले पाहिजे. इतर माणसाप्रमाणेच आपल्यालाही माणूस म्हणून जगण्याचे सर्व हक्क मिळालेच पाहिजे. ह्या आंबेडकरांच्या विचारामुळे दलित मंडळी शिकू लागली. आपले वेगळेपण दाखविण्यासाठी प्रवृत्त झाली.

कालांतराने आपण आपल्या पूर्वायुष्यात जे अन्याय सोसले, जे अत्याचार भोगले त्याविषयीचे दु:ख आणि संताप ते कवितेच्या माध्यमातून व्यक्त करू लागले. ती पहिल्या पिढीची दलित कविता आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये अभ्यास मांडणीच्या मर्यादा लक्षात घेऊन काही निवडक व प्रमुख कवींच्या काव्यलेखनाचाच येथे आढावा घेणार आहोत. अभ्यासाच्या सोयीसाठी स्थुलमानाने १९६० ते १९७५ पहिली पिढी, १९७५ ते १९८५ दुसरी पिढी आणि त्यानंतरची तिसरी पिढी असे गृहित तत्त्व घेतले आहे. दलित कविता ही आंबेडकरी प्रेरणीची आहे. ती चळवळीच्या माध्यमातूनच निर्माण झाली. १९६० ते १९७५ या दशकामध्ये दलित कवींची पहिली पिढी आली. पहिल्या पिढीतील सर्वच कवी

आंबेडकरांनी जाणवून दिलेल्या प्रखर जाणिवेने पेटलेले कवी आहेत. आपल्या पूर्वायुष्यातील अस्पृश्यता, दारिद्र्य, अज्ञानरुपी अंध:कार, त्यांना अत्यंत अस्वस्थ करतो. तोच वारसाच जणू त्यांना लाभलेला होता. साहजिकच पहिल्या पिढीतील दलित कवितेतून या जाणिवेचा आविष्कार राग, चीड, दु:ख आणि विद्रोह या भावनांनी ओतप्रोत भरलेला आहे.

पूर्वायुष्यातील आठवणींना उजाळा देणाऱ्या ह्या कविता अनेकदा शोकांतिकेच्या उंचीपर्यंत पोहचल्या आहेत. आपल्या जीवनाची शोकांतिका करणाऱ्या समाजविघातक रुढींच्या विरूद्ध आव्हानात्मक भूमिका घेऊन त्या रूढी नष्ट करण्याची भाषा अनेक कवितातून आलेली आहे. या काळात दलित साहित्य आणि दलित कविता यांच्या चळवळीची मुंबई, औरंगाबाद व नागपूर ही प्रमुख तीन ठिकाणे होती. त्या ठिकाणी दलितसाहित्य संम्मेलने आणि काव्यचर्चा घडत असे. त्याचा परिणाम म्हणून इतर शहरात, तालुक्यात, खेड्यात आंबेडकरांचे विचार सर्वदूर पर्यंत पोहचवले गेले. या पिढीतील कवीपैकी अनेकांनी ग्रामीण जीवनात दारिद्र्याचा अनुभवही घेतला होता. खेड्यातला प्रखर आणि दाहक जातिवाद, अज्ञान, दारिद्र्य, असहायता याचाही अनुभव त्यांच्या मनात खोलावर रूजला होता. साहजिकच अस्पृश्यतेचे किळसवाणे आणि भयानक रुप अनेक दलित कवींनी प्रभावीपणे रेखाटले आहे.

कवी लोकनाथ यशवंत यांच्या काव्याचा अभ्यास करतांना त्यांच्या आगेमागे काव्यलेखन करणाऱ्यांच्या निर्मितीचे स्वरुप लक्षात घेणे आवश्यक आहे. पूर्वपरंपरा आणि समकालीनांची कविता यावर दृष्टीक्षेप टाकल्यास कवी लोकनाथ यशवंताच्या लेखनाचे सामर्थ्य आणि वेगळेपण आपोआपच नजरेत भरते. यास्तव प्रत्येक पिढीतील निवडक पाच नामवंत कवींच्या कविता व कवयित्रींच्या कवितेवर दृष्टिक्षेप टाकला आहे.

## २.१ पहिल्या पिढीतील प्रारंभीचे नामवंत कवी :

### १) नारायण सुर्वे –

१९६० नंतरच्या कवितेला प्रभावित करणारी कविता म्हणून नारायण सुर्वे यांच्या कवितेचा उल्लेख करायला हवा. सुर्वे यांच्या कवितेच्या पावलांवर पाऊल टाकून दलित कविता आकारताना दिसते. दलित कवितेच्या निर्मितीला पाठबळ सुर्वे यांच्या कवितेने दिलेले आहे. एकूणच केशवसुत-मर्ढेकर यांच्यानंतर आधुनिक मराठी कवितेला वळण देण्याचे कामच सुर्वे यांच्या कवितेने केले.

कवी नारायण सुर्वे यांचे एकूण चार काव्यसंग्रह प्रकाशित झाले आहेत. ते क्रमश: असे. १) 'ऐसा गा मी ब्रह्म !', २) 'माझे विद्यापीठ', ३) 'जाहीरनामा', ४) 'नव्या माणसाचे आगमन', हे त्यांचे काही महत्त्वाचे काव्यसंग्रह. याखेरीज 'सनद' या संग्रहात त्यांच्या निवडक ६६ कविता संग्रहित करण्यात आल्या आहेत.

सुर्वे यांची कविता म्हणजे वास्तवाची प्राणकहाणी आहे. थकल्याभागल्या श्रमकऱ्यांची भावकथा या कवितेतून शब्दबद्ध होताना दिसते. जीवनाशी एखाद्या योद्धयाप्रमाणे ती झुंज देते.कामगार आणि दलित जीवनाचा प्रत्यक्ष अनुभव घेतल्यामुळे त्यांच्या कवितेतून सामाजिक, क्रांतीचा उद्घोष आढळतो. त्यांचा 'ऐसा गा मी ब्रह्म !' हा पहिला काव्यसंग्रह १९६२ साली प्रकाशित झाला. १९५६ पासून सुर्व्यांनी काव्यलेखनास प्रारंभ केला. १९५६ ते १९६२ हा कालखंड राजकीय व सामाजिकदृष्ट्या महत्त्वाचा होता. संयुक्त महाराष्ट्राची चळवळ, पंडित जवाहरलाल नेहरु यांचे निधन, गोवा मुक्तीलढा, गोदी कामगारांचा उठाव अशा कितीतरी घटनानी १९५० ते १९६० हे दशक गाजत होते आणि सारे समाज जीवन ढवळून निघाले होते. अशा काळात सुर्व्यांनी काव्यलेखनाला प्रारंभ केला होता. प्रारंभी गाणी गाईली. गाण्यांकडून ते कवितेकडे वळले. कामगार, समूह, वस्त्या, आंदोलने, साम्यवादाचा प्रभाव यातून सुर्व्यांची एक सामाजिक दृष्टी तयार झाली. आपण काय आणि कुणासाठी लिहावयाचे पक्के झाले. सुर्व्यांच्या मनातील सामाजिकतेचा विस्फोट

त्यांच्या 'चार शब्द' या कवितेत झालेला दिसून येतो. कामगार असल्याचा सार्थ अभिमान आणि त्यांच्यातील रोजीरोटीचा दैनंदिन व्यवहार सांगताना ते म्हणतात,

"रोजीचा रोटीचा सवाल रोजचाच आहे
कधी फाटका बाहेर कधी फाटका आत आहे
कामगार आहे मी तळपती तलवार आहे
सारस्वतांनो ! थोडासा गुन्हा करणार आहे"[१]
('चार शब्द', 'ऐसा गा मी ब्रह्म !' पृष्ठ क्र.१३)

सुर्व्यांची सामाजिकता म्हणजे साम्यवाद असा ध्वन्यार्थ 'कामगार तळपती तलवार' मधून अनेकांनी काढला आहे. सुर्व्यांची विशिष्ट कामगार वर्गीय दृष्टी असली तरी तिच्यातील अनुभवसृष्टी प्रामाणिक आहे. दैन्य, दारिद्र्य, याविषयी सुर्वे तितक्याच पोटतिडकीने लिहितात. 'दोन दिवस' या कवितेत सुर्वे म्हणतात,

"शेकडो वेळा चंद्र आला, तारे फुलले रात्र धुंद आली
भाकरीचा चंद्र शोधण्यातच जिंदगी बरबाद झाली
हे हात माझे सर्वस्व, दारिद्र्याकडे गहाणच राहिले
झोत भट्टीत शेकावे पोलाद तसे आयुष्य छान शेकले
दोन दिवस वाट पाहण्यात गेले, दोन दिवस दु:खात गेले"[२]
('दोन दिवस', 'ऐसा गा मी ब्रह्म !', पृष्ठ क्र.५३)

यामागे कवीचे व्यक्तिगत दुखणे असले तरी याच प्रकारचे सर्वच श्रमिकांचे जग आहे. नारायण सुर्वेच्या कवितेचे वेगळेपण सांगताना नरहर कुरुंदकर म्हणतात, "सुर्व्याची कविता भुकेच्या शमनार्थ भीक ते वाहत नेताना तिथेही आत्म्याशी बेइमान न होताना, माणुसकीची कळ जपणारी आहे. व्यथा हे या कवितेचे मुख्य स्वरुप आहे आणि व्यथेच्या भट्टीत शेकून घेऊनही शिल्लक राहिलेला माणूस या कवितेचा विषय आहे."[३]

## २) नामदेव ढसाळ :

नामदेव ढसाळांची कविता अन्य दलितांच्या कवितेपेक्षा अंतर्बाह्य निराळी आहे. त्यांनी काव्यलेखनास प्रथम सुरवात अनियतकालिकांमधून केली. मर्ढेकरांच्या कवितेतून

येणारे जीवनदर्शन जसे मराठी कवितेला नवीन होते. तसे ढसाळांच्या कवितांमधून येणारे जीवनही अनोखेचे होते. या अनोख्या जगाची कविता त्यांनी विपुल प्रमाणात लिहिली. त्यांचे काव्यसंग्रह – १) 'गोलपिठा', २) 'मुर्ख म्हाताऱ्याने डोंगर हलविला', ३) 'प्रियदर्शनी आमच्या इतिहासातील एक अपरिहार्य पात्र', ४) 'तुही इयत्ता कंची', ५) 'खेळ', ६) 'गांडू बगीचा', ७) 'या सत्तेत जीवन रमत नाही', ८) 'मी मारले सूर्याच्या रथाचे सात घोडे' इत्यादी काव्यसंग्रहातून ढसाळांनी जेथे पांढरपेशा हिशेबी माणसांची दुनिया नसते तेथून आपल्या कवितेतील माणसांचे जग सुरु केले आहे.

विजय तेंडुलकर लिहितात, ''हे जग रात्रीच्या दिवसाचे, रिकाम्या किंवा अर्धभरल्या सतत उपाशी राहणाऱ्या पोटांचे, उद्याच्या चिंतानी व्याकुळ होणारे, मरणाच्या खस्ता खात खात जगणारे शरम, संवेदना साऱ्या भावना कोळपून राहणाऱ्याचे आहे. त्यांचे जगही तितकेच वैविध्यपूर्ण आहे, पोटाशी पाय मुडपून झोपणारे तरुण रोगी, बेकार, भिकारी, खिसेकापू, दादा, बैरागी, भडवे जिथे महारोगी शरीरेसुद्धा किंमत देवून भोगली जातात, रस्त्याच्या कडेला, संभोगा शेजारीच बालके रडत असतात असे हे जग आहे.''[४] येथून कधीच कोणी पळून जाऊ शकत नाही, पळाले तरी परत ते 'गोलपिठा' मध्येच येतात.

''सर्वसामान्य माणसाला सत्ता, संपत्ती व प्रतिष्ठा यांपासून सूचित ठेवणाऱ्या, शोषणव्यवस्थेला सुरुंग लावण्याचा तमाम छोट्या मोठ्या चळवळींना प्रवृत्तींना''[५] नामदेव ढसाळांनी आपली कविता अर्पण केली आहे. यातून त्यांची भूमिका व कवितेची वैशिष्ट्ये लक्षात येतात. नामदेव ढसाळ त्यांची कविता ही प्रस्थापित मूल्यांचा विध्वंस करणारी कविता आहे. त्यामुळे शब्दांचा आणि भाषेचा नखरा तिला मान्य नाही. आशय हेच तिचे बलस्थान आहे, ती खोट्या अमूर्त आणि कल्पनेच्या जगात विसावूच शकत नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर त्यांची श्रद्धा आहे. 'डॉ.आंबेडकर' ही त्यांची दीर्घ कविता बाबासाहेबांच्या कार्याचे मूल्यमापन करणारी व त्यांच्या प्रती आपली श्रद्धा व्यक्त करणारी आहे.

''धर्माच्या जातीच्या लिंगाच्या वंशाच्या वर्गाच्या चिलखती खुराड्यांना
मूठमाती कल्पिणाऱ्या
झडणाऱ्या बासरीच्या मंद्र पावसात
आत्म्याला रस्ते फोडून विजेरी झाडांना घेरुन
ओढल्या गेल्यायत माझ्या दोऱ्या तुझ्या कर्तृत्वाच्या दिशेने''[६]

(डॉ. आंबेडकर, 'गोलपिठा', पृष्ठ क्र.५०)

इतर दलित कवीप्रमाणेच नामदेव ढसाळ अस्पृश्यतेचा शाप घेऊन जन्मास आले आहेत. त्या शापापोटी भोगाव्या लागणाऱ्या अनंत यातनांचे ते वाटेकरी आहेत. त्याचबरोबर या हीन-दीन समाजाची परिस्थिती बदलवू पाहणारे त्यांना माणुसकीकडे नेणारे, त्यांच्यात क्रांतीची बीजे रोवू पाहणारे दलित-मुक्ती आघाडीचे मान्यवर नेते आहेत. म्हणून त्यांची कविता अनेकदा बंडखोरीचा प्रत्यय देते. समाजकारणाबरोबरच तितक्याच सामर्थ्याने ढसाळ राजकारणही करीत असले तरी, राजकीय रंगाचे पुसटसेही दर्शन त्यांच्या कवितेत दिसत नाही. ही गोष्ट त्यांच्या मुलभूत प्रवृत्तीवर प्रकाश टाकणारी आहे. जगण्यातील असाह्य दाह सभोवतालच्या परिस्थितीतील असहाय्यता, भेदाभेद, चांगल्या वाईटाचे भावनात्मक आकलन त्यांच्या कवितेत प्रचंड प्रमाणात दिसून येते.

**३) दया पवार :**

दया पवार यांचे जिवंत अनुभवविश्व 'कोंडवाडा' या त्यांच्या कवितासंग्रहात प्रकट झाले आहे. डॉ. आंबेडकर, श्री. दादासाहेब रुपवते, लोककवी वामन कर्डक यांचे परिणाम दया पवार यांच्यावर विशेष झाला आहे. प्रा. रा.ग. जाधव पवारांच्या कवितेविषयी लिहितात, ''कवीचे अनुभव आणि कविता यांच्यामध्ये त्यांचे व्यक्तिमत्त्व आकार व घाट साधणे ही प्रक्रिया ते व्यक्तिमत्त्व करीत असते. ते त्या प्रक्रियेचे प्रेरक घटक असते. दया पवारांचा हा जो प्रक्रिया प्रेरक आहे तो मोठा वैशिष्ट्यपूर्ण आहे''[७] असे ते म्हणतात.

दया पवार यांनी आपल्या कवितेतून स्वतःच्या जीवनात भोगलेले दु:ख प्रकट केले आहे. त्या जीवनाचे चित्र ती भेदकपणे स्पष्ट करते. त्यासाठीच त्यांची कविता अवतरली आहे. म्हणून कवी म्हणतो, 'आम्ही गावकुसाबाहेर राहतो हा कां आमचा अपराध आहे ?

प्रत्येक झोपडीत अंधार पसरलेला आहे, त्यांचा उघडा-नागडा संसार, कमरेला वितभर पटकूर असते-नसते, अन्न, वस्त्र, निवारा नाही. परंपरेचे, संस्कृतीचे जोखड सतत मानेवर आहे. असं अवहेलनेच जिणं आम्ही पिढ्यान् पिढ्या जगत आहोत.'

"आज विषाद वाटतो कशा वागविल्या मणमणत्या बेड्या
गाळात हत्तींचा कळप असावा तशा ध्येय आकांशा रुतलेल्या
शिळेखाली हात होता तरी नाही फोडला हंबरडा"[८]

('कोंडवाडा', पृष्ठ क्र.४४)

दलित समाजावर नित्यनेमाने होणारे अत्याचार आणि अन्याय पाहून व्यथित होणारा आणि समाजाच्या विकासासाठी आसुसलेला हा कवी आहे.

## ४) केशव मेश्राम :

दलित कवीच्या पहिल्या पिढीतील एक अग्रगण्य कवी म्हणजे प्रा. केशव मेश्राम आहेत. आपल्या व्यापक जीवानुभवातून निर्माण झालेली काव्याची सखोल जाणीव व तिचा परिणामकारक आविष्कार ही मेश्रामांच्या कवितेची वैशिष्ट्ये आहेत. दलित कवी सामुहिक वेदना स्पष्ट करतो. तसाच तो आत्मरतही झालेला असतो.

कवी मेश्रामांचे १) 'उत्खनन', २) 'जुगलबंदी' व ३) 'अवस्मान' हे कवितासंग्रह प्रसिद्ध झाले आहेत. कवी मेश्रामांनी आपल्या कवितेमध्ये समाजात चाललेल्या भोंदुगिरीची व डोळे झाकून बसलेल्या समाजपुरुषांची चिरफाड केली आहे. अशा समाजपरीक्षणामुळे त्यांच्या कविता काहीशा स्पष्टिकरणात्मक झाल्या असल्या तरी प्रत्ययकारी झाल्या आहेत. 'गर्दीतल्या भेटीगाठी' या कवितेतील श्रीमंत गरीब ह्यांच्यातील सुक्ष्म संघर्षाचा वेध घेताना समाज चिंतनाबरोबर केलेले राष्ट्रचिंतनही अतिशय महत्त्वाचे आहे. स्वच्छ टोपीखालची स्वार्थाची घामट किनार ते रेखाटतात, त्याप्रमाणे निरनराळ्या संस्थानी वापरलेली शास्त्र, पंडित, शिक्षक ह्यांची चित्रे रेखाटन त्यातून काढलेला निष्कर्ष मनाशी जाऊन भिडतो. केशव मेश्राम म्हणतात,

"ह्या राष्ट्रपित्याचा फोटो हारांनी झाकलेला
तरी त्यातूनही मोजता येतात सगळ्या बरगड्या,
त्यांचे डोळे कृतार्थतेने पाणवलेले"[९]
('गर्दीतल्या भेटीगाठी', 'उत्खनन', पृष्ठ क्र.१४)

सर्वत्र होत असलेल्या पडझडीने त्यांचे चिंतनशील मन आक्रंदून जाते. ही पडझड केवळ एका व्यक्तीची, एका जातीची, एका समाज गटाची, एका देशाची नाही हे त्यांच्या लक्षात येते. ठिगळी मन या सगळ्या प्रकारात थांबवून जाते.

कवी मेश्राम यांची कविता 'माणूस' केंद्र आणि माणसाचे जीवन हा संदर्भ मानणारी कविता आहे. म्हणूनच त्यांची दलित कविता ही एकाच वेळी व्यक्ती व समाजाची, समाजहितासाठी लिहिली गेलेली कविता आहे.

"एक दिवस मी परमेश्वराला आईवरून शिवी दिली
तो लेकाचा फक्त फक्कन हसला,
..................................
शब्दांचे फटकारे मारीत मी म्हटले,
साल्या ! तुकड्याभर भाकरीसाठी
गाडीभर लाकडं फोडशील काय ?
बापाच्या बिडीकाडीसाठी
भावाबहिणींची हाडके झिजवशील ?
त्याच्या दारुच्या घोटासाठी भडवेगिरी करशील"[१०]
(एक दिवस मी परमेश्वराला, 'उत्खनन', पृष्ठ क्र.७४)

कवी आपल्या समाजातील माणसावर होणाऱ्या अन्याय अत्याचाराचे प्रत्ययकारी वास्तव चित्रण येथे करतो. चतकोर भाकरीसाठी गाडीभर लाकडं फोडावी लागतात. आईला म्हणजेच स्त्रीला फक्त लज्जा पटकुर अंगार घ्यायला मिळते. मुलांच्या घाम गाळणाऱ्याला तर तोडच नाही. अशा दलित समाजाच्या कष्टाच, दारिद्र्याचं दर्शन कवी मार्मिक शब्दात घडवितो.

### ५) वामन निंबाळकर :

दलित चळवळीत सहभागी असणारे पँथरचे सक्रिय कार्यकर्ते असलेले कवी वामन निंबाळकर होते. त्यांचे १) 'गावकुसाबाहेरील कविता' व २) 'महायुद्ध' हे दोन काव्यसंग्रह प्रकाशित झाले आहेत. आपण लहानपणी अनुभवलेल्या, भोगलेल्या दलित जीवनातील अनुभवांचा उत्कट आविष्कार त्यांनी आपल्या कवितामधून केला आहे. 'शब्दप्रभूनों' सारख्या कवितेतून विद्रोहाची स्फुल्लिंगे उधळलेली दिसतात.

> ''चांदण्यात न्हाऊ घातली तुम्ही
> तुमची कविता
> ......................................
> ह्या गावकुसाबाहेरचे वाळलेले, चिरडलेले जीवन
> विषय झालाच नाही, तुमच्या कवितेचा
> ......................................
> या गळपणाऱ्या चांदण्यात यांचे उद्ध्वस्त जगणे
> कळवळली नाहीत अशी तुमची मने ?
> कसे लिहिले नाही तुम्ही यांच्या आसवांचे गाणे''[११]

('शब्दप्रभूनों', 'गावकुसाबाहेरील कविता', पृष्ठ क्र.२)

कवी वामन निंबाळकरांनी समाजामध्ये वाट्याला आलेले गावकुसाबाहेरचे दु:ख आपल्या कवितेतून मांडले आहे. कवी शब्दप्रभु म्हणून मिरविणाऱ्या सवर्णांना उद्देशून स्पष्टच विचारतो की, गावकुसाबाहेरचे, वाळलेले, चिरडलेले, वेदना देणारे जीवन तुमच्या कवितेचा विषय कधी झालेच नाही. तुमची मने चांदण्यातही उद्ध्वस्त जीवन जगणाऱ्याकडे पाहून कधीच कळवळली नाहीत त्यांचे दु:खे तुम्हाला कधी समजलेच नाही. त्यामुळे त्यांच्या अश्रुंची गाणी तुम्ही लिहिलीच नाहीत. वास्तवात हे गावकुसाबाहेरचे जिणे म्हणजे दारिद्र्य, अज्ञान आणि अपार कष्ट हेच आहे. अपार दु:ख सोसूनही त्याबद्दलची तक्रार आम्ही आजवर कधीच मांडली नाही. आज मी तक्रार म्हणजेच दलित समाजाची कैफियत समाजापुढे मांडतो आहे.

“ज्या मराठी साहित्याला आजपर्यंत कुठल्याच दलित जाणिवेचा गंध नव्हता. त्या मराठी साहित्याची समीक्षामूल्ये दलित कवितेला लावून वामनरावांची कविता तपासली जाऊ शकत नाही, असे माझे स्पष्ट मत आहे. आजच्या ज्ञान-विज्ञान व यंत्रयुगाची आणि लोकशाही समाजवादाची मूल्ये होत असे मी मानतो. माणूस बदलू शकतो. बदलला पाहिजे यावर माझी निष्ठ आहे. निबांळकरांच्या कवितेत ही हाच विचार व्यक्त झाला आहे.”[१२] असे मत प्रसेनजित ताकसांडे मांडतात.

दलित कवितेच्या पहिल्या जोमदार लाटेनंतर दलित कवितेत काहीसा एकसूरीपणा, साचेबंदपणा येऊ लागला. अनुकरणही बऱ्याच प्रमाणात होऊ लागले. त्यामुळेच दलित कवितेत साचलेपणा आला आहे. असे आरोपही अनेक टीकाकारांनी केले. त्यात तथ्यांश नाही असे मुळीच नाही, परंतु साचलेपणाला छेद देणारी कविता याच काळात लिहिली जात होती. ती स्वत:चा वेगळा ठसा उमटवीत होती. अभ्यासाच्या काही मर्यादा लक्षात घेऊनच आपण येथे दुसऱ्या पिढीमधील निवडक कवींच्या कवितेचे स्वरुप पाहणार आहोत. दुसऱ्या पिढीतील दलित कवींच्या कविता प्रबोधन घडविते. डॉ. आंबेडकरांनी, म. फुले व गौतम बुद्धांनी कार्लमार्क्सने काय सांगितले व शिकवले यांचा विचार करणारी ही कविता आहे.

## २.२ दुसऱ्या पिढीतील नामवंत कवी :

### १) प्रल्हाद चेंदवणकर :

प्रल्हाद चेंदवणकरांनी १) ‘ऑडिट’ आणि २) ‘ऑर्डर ऑर्डर’ हे दोन काव्यसंग्रह लिहिले आहेत. ‘ऑडिट’ या काव्यसंग्रहामधील कविता स्वत:च्या जीवनातील अक्षरश: आग ओकीत आहेत. कवी आपल्या वाट्याला आलेल्या जीवनानुभवातून दु:ख मांडीत आहे. त्यांच्या कवितेमध्ये असंतोष, भ्रमनिरास, नैराश्य, यंत्रयुगात आलेले औदासीन्य, अशा वेगवेगळ्या प्रकारच्या भावना प्रकट झाल्या आहेत.

त्यांनी दलितांच्या वाट्याला आलेल्या जीवनाला दिलेली प्रतिमा ‘कप एक चहाचा’ ही कविता फार बोलकी आहे.

''तुटलेल्या कानाचा – फुटलेल्या तोंडाचा
विरलेल्या अंगाचा, ठार मेल्या मनाचा
मारला तरी मरत नाही – जिता
असून सुकाळीचा
खेडेगावातला हॉटेलातला
कप एक चहाचा''[१३]

('एक कप चहाचा', 'ऑडिट', पृष्ठ क्र.२४)

या कवितेच्या ओळीमधून त्यांनी आपल्या समाजाचे भेदक आणि जिवंत चित्रण केलेले आहे.

आतापर्यंतचे दु:ख सोसणारे आगतिक, लाचार, असलेले दलित मन आता क्रांती करणारे आहे. ते आता थांबणार नाही. पुढे जाणार आहे. याची जाणीव चेंदवणकरांनी आपल्या कवितेतून दिली आहे. चेंदवणकराच्या कवितेविषयी डॉ. भालचंद्र फडके लिहितात, ''प्रल्हाद चेंदवणकरांची कविता स्वातंत्र्य प्राप्तीनंतर सामान्य जनतेचा जो भ्रमनिरास झाला, त्याचा प्रभाविपणे आविष्कार करते.''[१४]

२) **त्र्यंबक सपकाळे :**

अत्यंतिक दारिद्र्य व कष्टमय जीवनातून मॅट्रिक पर्यंत शिक्षण घेतलेल्या सपकाळांचे 'सुरुंग' आणि 'ब्रोकमेन' हे दोन काव्यसंग्रह प्रसिद्ध आहेत. स्वातंत्र्याचे पाव शतक लोटले तरी मी तिथेच आहे. मी तिथेच राहणार का ? .....मनात एक सुरुंग........ स्फोट................'सुरुंग' च्या मनातल्या या ओळी आता २५ वर्षे उलटून गेली तरीही कवीच्या मनात उठलेले प्रश्न अजून तसेच आहेत. आंतरिक स्फोटाचा प्रचंड नाद आणि त्यांचे सादपडसाद, सपकाळे यांच्या कवितेत प्रभावी रीतीने व्यक्त होतात.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आणि बुद्धाच्या महान कार्याचा आठव दलित कवितेचा प्राण आहे. बाबासाहेबांच्या विधायक कार्याचा व विचार प्रणालीचा आणि बुद्धाच्या तत्त्वविचाराचा पुनरुच्चार ही तिची प्रत्येक शक्ती आहे. दलित कवितेचाच नव्हे तर तो केवळ विध्वंसक, विद्रोही नाही क्वचित विसंगती सोडली तर या प्रेरक सत्याची जाणीव

त्र्यंबक सपकाळे यांच्या कवितेत आहे. म्हणून तिरस्कार अपमान देणाऱ्या या जगाला डोळ्यातून निघणाऱ्या अंगाराने बेचिराखच केले असते. अपमानाची सव्याज परतफेड केली असती असे तो म्हणतो. प्रत्यक्षात असे करणे अशक्य असल्याची जाणीव जागी होऊन तो म्हणतो,

"परंतु आता ते
सर्व वर्ज्य आहे
मी पाईक झालो ना
भगवंताच्या तत्त्वज्ञानाचा
प्रज्ञा करुणेचा"[१५]

('बाराखडी', 'सुरुंग', पृष्ठ क्र.३६)

आंबेडकरांचा खरा अनुयायी आततायी, क्रुर कृत्ये करणारा नाही. अशी वैचारिक नम्रता ते व्यक्त करतात. श्रद्धास्थानी असलेल्या आंबेडकरांच्या भगवंताच्या तत्त्वज्ञानाचा, प्रज्ञेचा अपमान करणे, त्यांची कारुण्याची शिकवण विसरणे योग्य नाही असेच कवीला वाटते. कवितेतील ही विधायक जाणीव लक्षणीय स्वरुपाची म्हणायला हवी.

### ३) अर्जुन डांगळे :

अर्जुन डांगळे हे सामाजिक व राजकीय चळवळीत असलेले हे एक साहित्यिक होत. त्यांनी कविता आणि वैचारिक लेखन इत्यादी क्षेत्रामध्ये कार्य केले आहे. 'छावणी हालत आहे' हा त्यांचा काव्यसंग्रह प्रसिद्ध झाला आहे. त्यांच्या कवितातून समाजजीवनाच्या कुरुपतेची चित्रे जेवढ्या प्रभावी रीतीने येतात तितक्याच स्वाभाविकपणे मानवी मनाच्या सोशिकतेचा व समंजसपणाचा उद्‌गारही येतो.

दलित पँथरच्या कार्यकर्त्यांच्या मुखातून निघालेल्या संघर्षात्मक घोषवाक्यांचे रुप त्यांनी आपल्या कवितांना दिलेले आहे. त्यांच्या कवितेतील संघर्षाचा वणवा केवळ दलित जनतेपुरता मर्यादित नाही. ती कविता जात, समाज देश त्यांची बंधने तोडून विश्वाला गवसणी घालू पाहते. दलितांचे मोठे दु:ख हे आहे की, आपण ज्या देशात राहतो, त्या देशाला आपले म्हणता येत नाही. म्हणून कवी म्हणतो की, या देशात माझी म्हणावी अशी

मातृभूमीच नाही. संबंध देशात आपण पोरके आहोत, अनाथ आहोत, एकाकी आहोत. ही खंत अर्जुन डांगळे व्यक्त करतात.

''इथली एकही वाट माझी म्हणून
मला वाटत नाही
माझ्या पावलांना वेग घ्यायला
मुळीच सुचत नाही''[१६]

('मी निघालोय', 'छावणी हलते आहे', पृष्ठ क्र.१२)

अर्जुन डांगळे यांच्या कवितेत लढावू वृत्ती आहे. त्यांची कविता ही संघर्षाच्या मनोवृत्तीतून निर्माण झालेली कविता आवेशयुक्त ठरते. मर्यादेचे कुंपण ओलांडून जाणारी वृत्ती क्वचित निराशही होते आणि अशा अवस्थेत

''सारे कसे उदास भकास
दिव्याची ती प्रचंड रांग
मलूल खिन्न कळकट मळकट
रेशनींगच्या रांगेसारखी''[१७]

('कोडे', 'छावणी हलते आहे', पृष्ठ क्र.२६)

कवी आपले खिन्न उदास जीवन कसे आहे हे सांगताना जीवनाला 'मलूल कळकट मळकट रेशनींगची रांग' म्हणतो यातून त्याला वाटणारा आयुष्याचा फोलपणा भकासपणा नेमकेपणाने व्यक्त होतो.

दलितांच्या दुःखाची कल्पना दलितेतरांना येणार नाही म्हणून आपल्या एका कवितेत कवी म्हणतो –

''जगत आहोत आम्ही इथे, जगावे लागते म्हणून
तर असे हे जिणे जगत असताना
ही महानगरी आमच्यावर आणखी खुष झाली
'बेडारी' नावाची तिची प्रियतम पदवी आम्हा बहाल केली''[१८]

('युगधर्म', 'छावणी हलते आहे', पृष्ठ क्र.१०)

जगायचे म्हणून आम्ही जगतो आहोत. जगण्यास आवश्यक असणाऱ्या कोणत्याच गोष्टी आम्हाला या नगरात उपलब्ध नाहीत असे आश्रितासारखे जगत असतांना सोयी सुविधा नाहीत पण 'बेकार' ही पदवी मात्र या महानगराने आम्हाला बहाल केली आहे. यातील उपरोध अत्यंत समर्पक आणि बोचरा आहे. बेकारीमुळे जगण्यात दारिद्रयाची भरच पडते आहे. महानगरातील दलितांच्या जीवनाचे यथायोग्य वास्तव चित्रण डांगळेची कविता करते.

### ४) यशवंत मनोहर :

यशवंत मनोहर यांच्या कवितेचेही दलित कवितेत महत्त्वाचे स्थान आहे. त्यांनी १) 'उत्थानगुंफा', २) 'डॉ. आंबेडकर : एक चिंतन काव्य', ३) 'मूर्तिभंजन' हे तीन कवितासंग्रह प्रसिद्ध केले आहेत. त्यांची कविता दलित जाणिवेलाच व्यक्त करीत आहे. ईश्वरशाही, अध्यात्म,कर्मविपाकाच्या नावाखाली येथे जे सतत शोषण केले गेले त्या शोषणाविरुद्ध लढा देण्यासाठी ही कविता पुढे आलेली आहे. बाबुराव बागूल मनोहरांच्या कवितेविषयी म्हणतात, "मनोहरांची कविता म्हणजे, अग्निप्रलय आहे" मनोहरांचा विद्रोह अगदी पोटतिडकीतून व्यक्त होतो. सोज्वळ सुफलित शब्दांना हा विद्रोह फाटा देतो. आपल्या वैऱ्यांना आपमतलबी, बगलबच्चे, हरामखोर, सैतान अशा बिरुदानी धिक्कार करताना तो म्हणतो,

"ते सर्व देव दैववादी माझे वैरी आहेत
ज्यांनी अस्पृश्यता अभंग केली तिची मधुर ओवी केली
ते शब्दप्रमाण्यवादी सगुण निर्गुण वैरी आहेत माझे"[१९]
('वैरी', 'उत्थानगुंफा', पृष्ठ क्र.१५)

यशवंत मनोहरांची कविता जेव्हा जशी तत्वज्ञानाकडे वळते तेव्हा ती केवळ सवर्णाने केलेल्या दलितांच्यावरच्या आत्मचाराची होत नाही. भा.ल. भोळे यांच्या म्हणण्याप्रमाणे, "पूर्वास्पृश्यांच्या जीवन भोगाच्या पातळीवरून ती येऊन पोहते ज्यांना - ज्यांना या समाजातल्या क्रूर व्यवस्थेने बळीचे बकरे केले त्या सर्वांचा उद्‌गार होते."[२०]

मनोहर यांची कविता दलित कवितेच्या मर्यादा ओलांडून समर्थपणे पुढे जाणारी कविता आहे.

**५) बळवंत कांबळे :**

दलित समाजावर नित्यनेमाने होणारे अत्याचार आणि अन्याय पाहून व्यथित होणारा आणि समाजाच्या विकासासाठी आसुसलेला हा कवी आहे. त्यांनी आपल्या 'निषेध' या काव्यसंग्रहातील 'निषेध', 'पेटते हिल्लोळ', 'माप', 'निषेधार्थ', 'समज', 'आम्ही मात्र', 'सत्य', 'माझी कविता', 'पाटलाचा रेडा मेला तेव्हाची गोष्ट' इत्यादी कवितांतून सामाजिक निषेध नोंदविलेला आहे. त्यातून कविचे चिंतन दिसून येते. या चिंतनापाठीमागे विशिष्ट परिस्थितीची अन्यायाची समज देणारे कविमन आलेले आहे. विसाव्या शतकातही माणसावर होणाऱ्या जुलुम, अत्याचाराविषयी कोरडी सहानुभुती दाखविणाऱ्या मानवी प्रवृत्ती पाहून हा कवी व्यथित होतो. आपल्या समाजावर होणाऱ्या अन्याय, अत्याचारासंबंधी तो म्हणतो,

"अजुनही आमच्या डोक्यात बसविल्या जातात परंपरेच्या अंधार लाटा
समजत नाही मला कां धारण करतात पुरोगामित्वाचा खोटा मुखवटा
किती काळ तुटून पडणार आहात गिधाड्यासारखे
किती काळ तोडणार आहात आमच्या जगण्याची आधार पाळे-मुळे."[२१]

('निषेध', 'निषेध', पृष्ठ क्र.१२)

सवर्णांना कवीने रोख ठोक शब्दात आमच्या डोळ्यात परंपरेच्या लाटा आणि माणुसकीवर बलात्कार करण्याच्या वागण्याचा जाब विचारला आहे. तसेच नराधमांनो, गिधाडानो असे संबोधून एकदम परखडपणाने विद्रोही भूमिकेतून मनांत खदखदणारा संताप व्यक्त केला आहे. कवीच्या मनावर माणुसकीवर होणाऱ्या अत्याचाराचा खोलवर परिणाम झालेला आहे. त्यामुळे त्याची दृष्टी आंबेडकरी विचारांकडे आत्मीयतेने आपुलकीने पाहण्याची आहे.

"तुझा तत्त्वज्ञानावर
उभा राहिलेला हा खंडप्राय देश
आणि -
तुझ्या चळवळीचे पायिक होऊन
समतेचा झेंडा खांद्यावर टाकून निघालेली काही तथागत मंडळी
आज, काल अशी का वागताहेत मला समजत नाही."[२२]

('संशोधन', 'निषेध', पृष्ठ क्र.१७)

आंबेडकरवादाबरोबरच हा कवी मार्क्सवादानेही प्रभावित झालेला आहे असे त्यांच्या काही कवितावरून वाटते.

वरील सर्व विवेचनातून आपणास असे म्हणता येईल की, नारायण सुर्वे, नामदेव ढसाळ, दया पवार, केशव मेश्राम, वामन निंबाळकर, या पहिल्या पिढीतील कवींनी वेदना, विद्रोह व्यक्त करतानाच प्रबोधन सूत्र आपल्या कवितेत अंगीकारले होते. भाषा उग्र, रोखठोक, जहाल होती. परंतु त्यातून दलित माणूस खडबडून जागा होत असे. डॉ. आंबेडकरांचे विचार, महात्मा फुल्यांचे विचार, तर कधी या कवीनी समाजापर्यंत पोचविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले आहे यात शंकाच नाही.

दलित कवींची दुसरी पिढी प्रबोधन घडवितेच शिवाय स्वशोध घेताना दिसते. डॉ. आंबेडकरांनी, महात्मा फुले व गौतम बुद्धांनी, कार्लमार्क्सने काय सांगितले, शिकवले यांचा विचार करणारी दुसऱ्या पिढीची कविता आहे. यामध्ये प्रल्हाद चेंदवणकर, त्र्यंबक सपकाळे, अर्जुन डांगळे, यशवंत मनोहर, बळवंत कांबळे इत्यादी कवींनी पहिल्या पिढीच्या ज्ञानानंतर प्रत्यक्षात काय घडले आणि काय घडणे अपेक्षित होते याचा शोध घेऊन अधिक आक्रमक आणि विद्रोही होण्याचे आवाहन समाजात केलेले दिसते.

प्राचीन 'दलित कविता' आणि आधुनिक 'दलित कविता' यांच्या वेदना अनुभूतीत एक स्वागतार्ह फरक जाणवतो. जनाबाईंच्या उद्‌गारात तक्रारींचा सूर नाही. प्रारब्ध प्राप्त भोगानुसार आपली तीच पायरी होय, अशी शरणागती तेथे आहे. उलटपक्षी, 'ज्यांनी इथल्या सूर्याला ऐहिक स्वार्थासाठी अध्यात्माचे रंग दिले, त्या हरामखोर परंपरांवर मी विध्वंसाचा

नांगर धरतो' ही आजच्या दलित कवींची विजिगीषा यशवंत मनोहरांनी प्रभावीपणाने व्यक्त केली आहे. 'चोखा डोंगा परी भाव नव्हे डोंगा' अशी हळवी समर्पणशीलता आणि पूर्ण शरणागती प्राचीन दलित कवितेची स्थायी वृत्ती बनली होती, तर चोख्याचा भाव डोंगा नाही. जितके खरे आहे, तितकेच स्वत: चोखा हा सुद्धा डोंगा नाही, तोही 'चोखा' आहे, चोखट-शुद्ध आहे, हे तितकेच खरे आहे, असा उदंड आत्मविश्वास आधुनिक दलित कवितेने जोपासला आहे. ''[२३] असे डॉ. हेमंत इनामदार म्हणतात.

स्वातंत्र्योत्तर काळातील आजवरच्या अर्धशतकाच्या वाटचालीत अनेक स्थित्यंतरे आणि उलथापालथी झाल्या आहेत. ''१९७०-८० या दशकात पँथरच्या चळवळीने चेतना जागृतीचे मोठे कार्य केले. चळवळीला एक नवी उर्जा प्राप्त करून दिली. तरूण पिढीत जोरदार आणि जोमदारपणाचे सळसळते चैतन्य निर्माण झाले. परंतु याही चळवळीला मुलभूत परिवर्तनासाठी लोकशक्तीच्या कृतीशिलतेत परावर्तीत होता आले नाही. याच काळातील आणीबाणीने छोट्या मोठ्या पुरोगामी चळवळींची मुस्कटदाबी केली.''[२४] असे महेंद्र भवरे म्हणतात.

आंबेडकरांनी मुलभूत परिवर्तनाची प्रेरणा देऊन सुद्धा उत्तरकाळातील त्यांच्या अनुयायाकडून वास्तवात तसे का घडू शकले नाही याची कारणमीमांसा भवरेनी प्रस्तुत अवतरणात केली आहे.

तिसऱ्या पिढीतील कवींनी दलित कवितेला एक वेगळा आकार देण्याचा प्रयत्न केला आहे. पूर्वसूरींच्या कवितेपेक्षा अभिव्यक्तीच्या नव्या वाटा चोखळणाऱ्या या पिढीची कविता श्रेष्ठ आहेच शिवाय मराठी कवितेच्या मुख्य धारेत मध्यवर्ती स्थान मिळावे असे श्रेष्ठ सामर्थ्य या पिढीच्या कवितेत आहे. दलितांची दु:खे आज शतकानुशतके चालत आलेली आहेत. कायद्याने केवळ वरवर, दिखावू स्वरुपात अस्पृश्यता नष्ट झालेली आहे. आंबेडकरांनी अपेक्षित असलेले मुलभूत सामाजिक परिवर्तन एवढा काळ उलटून सुद्धा घडून आलेले नाही. परिवर्तनासाठी चळवळ, लढे, संघर्ष, झाले. परंतु दलित समाजातील नेत्यांच्या, पुढाऱ्यांच्या स्वार्थी वृत्तीमुळे, मतलबीपणामुळे तळागाळातला माणूस तिथेच राहिला आहे. ही

आत्मशोधातील नवी जाणीव या पिढीतील कवींना झालेली आहे. याचे वेगवेगळे आविष्कार नव्या प्रवाहातील तिसऱ्या पिढीतील कवींच्या कवितेतून दिसून येतात.

## २.३ तिसऱ्या पिढीतील नामवंत कवी :

### १) वाहरू सोनवणे :

वाहरू सोनवणे यांचा 'गोधड' हा काव्यसंग्रह प्रसिद्ध झालेला आहे. या कविचा पिंड मूलत: कार्यकर्त्यांचा आहे. 'गोधड' मधून वेगळा आशय आणि अनुभवविश्व प्रत्ययाला येते. 'गोधड' या शीर्षकापासूनच एका फाटक्या समूहजीवनाचा निर्देश होतो. 'गोधड' किंवा 'गोधडी' ही ठिगळाठिगळांनी जोडलेले समूहजीवन गावकुसापासून हजारो कोस दूर आहे. मुलभूत गरजांची ही जिथे पुर्तता होऊ शकत नाही अशा अवस्थेतील इथेल जगणे आहे.

आर्यांच्या आगमनानंतर आदिवासींना हिंदू संस्कृतीचे गुलाम बनवून रानटी ठरविण्यात आले. तेव्हापासून आदिवासी सतत झगडत राहिला. मात्र यशस्वी होऊ शकला नाही. देशावर आर्यानंतर रजपूत व मुस्लिमांचेही आक्रमण झाले. मुस्लिम राज्यकर्त्यांकडून देशवासियावर धार्मिक जबरदस्ती करण्याचे प्रयत्न झाले. इंग्रजांनीही आदिवासींची लूट केली. जेव्हा जेव्हा आदिवासींनी आपले हक्क, स्वातंत्र्य, मागितले तेव्हा तेव्हा त्यांना गुन्हेगार, चोर, डाकू म्हणून त्यांचेवर जुलमी कायदे लावण्यात आले. त्यांना राष्ट्रीय प्रवाहाच्या बाहेर ठेवण्यात आले. ऐरवी अप्रत्यक्षपणे नागवणूक करणे सुरुच असते. या तणावग्रस्त जगण्याचा, इतिहासाच्या प्रत्येक टप्प्यावरील शोषणाचा इतिहास सोनवणे यांची कविता स्पष्ट करते.

> "आम्ही स्टेजवर गेलोच नाही, आम्हाला बोलावलही नाही
> बोटाच्या इशाऱ्यांनी आमची पायरी आम्हाला दाखवून दिली
> आम्ही तिथेच बसलो आम्हाला शाब्बासकी मिळाली
> आणि ते स्टेजवर उभे राहून आमचे दु:ख आम्हालाच सांगत राहिल."[२५]
>
> ('गोधड', पृष्ठ क्र.४७)

या ओळीतून व्यवस्थेचा कावेबाजपणाच स्पष्ट झाला आहे. या व्यवस्थेने अनेक पातळ्यावरून शोषण केले आणि भूतदयावादी दृष्टीतून खेळीसारखा वापरही केला. तिने स्वत:चे उखळ पांढर करून घेतले. अशा प्रकारे कवी राजकीय परिस्थितीचे चित्र आत्मशोधाच्या जाणिवेतून रेखाटतो.

**२) अरूण काळे :**

दलित कविता आज निश्चित अशा नवीन वळणावर उभी आहे. अंतर्मुखता आणि आत्मटीकेच्या मार्गाने या कवतेचा मुख्य प्रवाहाच्या केंद्राकडे प्रवास सुरु झाला आहे. लहू कानडे, प्रज्ञा लोखंडे आदींच्या कवितांनी हे सिद्ध केले आहे. बबन लोंढे, अविनाश गायकवाड ही नांवेही पुढे येत आहेत. या पार्श्वभूमीवर अरूण काळे हे नाव अधिकच उठून दिसणारे आहे. समकालीन दलित कवितेत अरूण काळे यांच्या कवितेचे मोठे योगदान आहे.

'रॉक गार्डन' या कविता संग्रहामध्ये सांस्कृतिक जमिनीवरील दगडी बागेतील म्हणजेच या मातीतील काळोखी पिकांच्या अनर्थांचे मूळ शोधण्याचा प्रयत्न केला आहे. तर 'सायरनचे शहर' या दुसऱ्या काव्यसंग्रहात मूलत्ववादाचे मूळ आणि कूळ यांचा शोध काळे घेताना दिसतात. 'सायरनचे शहर' सर्वसामान्यांच्या जगाला हसणारे आणि नकाराधिकार वापरणारे आहे. मुक्या मारातून वेदना गिधाड्यांनी साम्राज्य प्रस्थापित केले आहे. या शहराचा तोल केंव्हाही ढळतो. झोपेची गोळी घेऊनही अस्वस्थ अंधार जागवणारे हे शहर तसे बेटांचे आहे. दोन नंबरी नगरपाल या शहराचे पालक आहेत. या शहरातील रस्ते अशक्त नसनासाड्यासारखे असून, या रस्त्यावरील माणसांची जिंदगी लुटली जाते, हे शहर रस्तोरस्ती शरीराची मागणी करते. संवेदनांना गाडत जाणाऱ्या या शहरात माणसे लोकल्सच्या मुडदाही पाडतात. शेअर्ससारखे वधारतात आणि कोसळतात. इथ माणसागणिक संदर्भ बदलतात, 'ही नगरी बंडी बंका जीवावर रोज प्रसंग बाका' इथे पोटासाठी प्रत्येकाच्या डोळ्यावर सरण बांधलेले दिसते हे शहर धर्मांध असून माणसाच्या सुरक्षिततेची कोणतीच हमी या शहरात नाही. रक्ताचा रंग सर्वत्र सारखाच असतो. त्याप्रमाणे जातधर्म टिकवणाऱ्या सर्वांच्या जळण्याचा एकच वास आसमंतात पसरला आहे.

15381

"नागर संस्कृतीचे हे शहर अभिमानी
आरस्पनी गोसायाच्या शेंडीवाणी
या शहरात आपण केंव्हाही होऊ शकतो
भुईसपाट......."[२६]

('सायरनचे शहर', पृष्ठ क्र. ६४)

मुंबई शहराच्या विविध पैलूंचे आक्राळ-विक्राळ रुप अरूण काळ्यांच्या कवितेतून साकार केले आहे. महानगरीय वास्तवाचे उग्र दर्शन घडविणे एवढेच या कवितेचे कार्य नाही. हे शहर कोण्या एका नगराचे प्रतीक नसून विविध तणावाखाली जगणाऱ्या तुमच्या आमच्या मनावर दहशतीचा पंजा सतत उगारुन असणाऱ्या, माणसाच्या रक्ताची मागणी करणाऱ्या, हिंस्त्र आणि अमानुष शक्तीचे युद्धखोर आणि कृद्धक्रुर शक्तीचे प्रतीक ठरते.

दलित कविता म्हणून काळे यांची कविता श्रेष्ठ आहेच. शिवाय तिला चिंतनाचे तेजही अधिक आहे. उपरोध, उपहास हा त्यांच्या कवितेचा स्थायीभाव असला तरी आत्मानुभूतीचे कलात्मक आविष्करण हे त्यांच्या कवितेचे प्रबळ तत्त्व आहे.

### ३) दीपक त्रिभुवन :

गेल्या पंधरा सोळा वर्षापासून दीपक त्रिभुवन सातत्याने काव्यलेखन करीत आहेत. आजच्या दलित कवींच्या नव्या उमेदीने कविता समृद्ध करू पाहणाऱ्या कवींच्या दीपक त्रिभुवन हे नाव अग्रस्थानी आहे. त्यांचे १) 'खोल खदानी', २) 'माणसाचा जनक' आणि ३) 'इतर कविता' हे दोन कवितासंग्रह प्रसिद्ध झाले आहेत. त्यांची कविता आत्मशोधातून चिंतनगर्भतेकडे झुकणारी आहे. शब्दाची ताकद त्याचा अस्त्र म्हणून होऊ शकणारा वापर याचे भान कवीला असल्याचे कवितेतून प्रत्ययाला येते.

"रक्तामासाचा देह म्हणजे माणूस नव्हे
मी रिक्त होतो
शब्दांचे उफाळतो उरूस म्हणजे सत्य नव्हे
मी अव्यक्त होतो."[२७]

('खोल खदानी')

अशा सारख्या शब्दयोजनेतून त्रिभुवन यांच्या कवितेचा आवाका लक्षात येतो. कवीने संग्रहाला दिलेले शीर्षक 'खोल खदानी' हेही अत्यंत सूचक आहे. समकालीन दलित कवितेच्या प्रवाहात दीपक त्रिभुवन हा महत्त्वाचा कवी असून दलित कवितेला वेगळे नवे वळण देण्याचा प्रयत्न त्याच्या कवितेने केला आहे. माणसा-माणसातील विश्व सतत लढत ठेवण्याचा प्रयत्न इथल्या व्यवस्थेने केला. आमचा देह माणसासारखा आहे. म्हणून माणूस एवढाच संदर्भ ध्यानात घेतला. एरवी माणसाप्रमाणे आमच्याशी कुणीही वागले नाही केवळ शब्दांचे उरूस निर्माण केले गेले. केवळ बोलण्यात मोठेपणा, समानता सांगितली गेली. वागण्यात ती मुळीच आणली नाही. हे खरे वास्तव कवी दाखवतो. कारण ते त्याला अंतर्यामी अस्वस्थ करते.

**४) लहू कानडे :**

कवी लहू कानडे यांच्या १) 'क्रांतिपर्व' आणि २) 'टाचाटिभा' या दोन काव्यसंग्रहातून अनुभवांची एक खास भाषा अभिव्यक्त झाली आहे. त्यांनी त्यातून एक सांस्कृतिक जग उभे केले आहे. 'टाचाटिभा'तील सुरवातीच्या 'आज बाप आणि मी' या शीर्षकांच्या कवितातून अधोरेखित होते. स्वातंत्र्यपूर्वकाळात अस्तित्त्वात असलेल्या ग्राम व्यवस्थेत गावगाड्याशी संबंधित असलेल्या बारा बलुतेदारांपैकी 'चर्मकार' हा एक बलुतेदार होता. ग्रामसंस्कृतीच्या शेती जीवनाशी असणारे साहित्य अवजारे पुरविण्याचे काम बलुतेदारांना करावे लागत असे. ग्रामीण जीवनात वाडा संस्कृतीत सरंजामशाहीचे वर्चस्व होते. म्हणून हेलपाटे वाट्याला येणे क्रमप्राप्त होते. आज मुलाच्या वाट्याला जे आले तेच बापाच्या वाट्याला आले होते. कारण जन्माधिष्ठित व्यवसाय वर्णव्यवस्थेने ठरवून दिले होते. 'आरी रापी आले बापा हाती' असे परंपरागत व्यवसायच करणे सर्वांना भाग पडत होते.

''आठवून हाल<br>
रडायचा बाप

चावायचे साप
गतीचेच''[२८]

('टाचा टिभा', पृष्ठ क्र.१४)

बापाचे हाल आठवून दु:ख झाले आपणास हेच दु:ख मिळणार हे कळून व्यवसाय करू नये वाटले. तरी शक्य नव्हते असा अस्पृश्यतेचा दाहक अनुभव या जगण्याच्या केंद्रस्थानी होता. जातिव्यवस्थेने दिलेल्या अटळ दु:खाची कहाणी 'टाचाटिभा'मधील अनेक कवितातून व्यक्त झालेली दिसते.

**५) राम दोतोंडे :**

राम दोतोंडे यांचा पहिला काव्यसंग्रह 'रापी जेव्हा लेखणी बनते' आणि दुसरा काव्यसंग्रह 'गल्ली बदलेला मोर्चा' प्रकाशित झाले आहेत. कवी राम दोतोंडे हे एक दलित चळवळीतील कार्यकर्ते आहेत. त्यांच्या 'रापी जेव्हा लेखणी बनते' या काव्यसंग्रहाचे वैशिष्ट्ये म्हणजे त्यांनी दलित साहित्य चळवळीला एका नव्या जाणिवेची ओळख करून दिली. त्यांनी परिवर्तनाची ओढ, आंबेडकरी विचारनिष्ठा, एकात्म आणि एकसंघ चळवळीची आवश्यकता, बौद्धेतर जाती समुहांची दु:खे आणि वेदना, त्यांतील तरुणांचा स्वजातीयविरूद्धचा संघर्ष इत्यादी गोष्टी आपल्या कवितेतून मांडल्या आहेत. 'रापी जेव्हा लेखणी बनते' हे शीर्षकच बोलके आहे. 'रापी' हे चांभाराचे पारंपरिक हत्यार. तेच आता लेखणी बनून आपले दु:ख मांडते आहे.

त्यांचा दुसरा काव्यसंग्रह म्हणजे 'गल्ली बदलेला मोर्चा' यामध्ये कवीचे इतिहासाबद्दलचे चिंतन परखडपणे जाणवते. हे या काव्यसंग्रहांचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणावे लागेल. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे दलित कवितेचे प्रेरणास्थान आहेत. आंबेडकरांनी दलित माणसाला आत्मभान दिले. आपल्यावर होणाऱ्या अन्यायाविरूद्ध बंड करून हे अन्याय मोडून टाकण्यासाठी प्रवृत्त केले. लढण्यासाठी आत्मविश्वास दिला. स्वावलंबी होऊन आत्मसन्मानाने जगण्यास शिकवले म्हणूनच या लढ्याला मुक्तीलढा असे म्हटले जाते.

बाबासाहेबांची ही चळवळ केवळ एखाद्या विशिष्ट जातीसाठी होती असे नाही तर ती संपूर्ण मानवजातीच्या मुक्तीची चळवळ होती. परंतु अलिकडे समाजामध्ये या चळवळीतच अंतर्विरोध निर्माण झाले. ही चळवळ जाती-पोटजातीत विघटीत झाल्याने तिचे सारे गट तट एकमेकांच्या द्वेष आणि मत्सरावर, अविश्वास आणि असूयेवर, एकमेकांशी स्पर्धा करीत पोसले गेले. त्यामुळे या चळवळीतील मूळ कार्याशी एकनिष्ठ असणारे अनेक विचारवंत, कवी, लेखक आणि कार्यकर्ते अस्वस्थ झाले. अनेकजण एकाकी पडले आणि काहीजण उलट-सुलट टीकेची शिकार बनले. त्यापैकी कवी राम हे एक आहेत. पुढील कवितेच्या ओळीमधून त्यांनी चळवळीचे अंतरंग स्पष्ट कले आहे -

''तुझा 'जयभीम' खोटा
'जय जगजीवनराम' म्हण
तुझा जयजयकार खोटा
'पाय लागू मायबाप' म्हण
आढळल्यावरही सादळायची
परंपरा तुमची
ढोरांची हाडकं फोडली
लढवय्याची जात आमची.''[२९]

('मी जात आणि ते', 'गल्ली बदलेला मोर्चा', पृष्ठ क्र. ८७)

चळवळीत अपमान, अवहेलना आणि कुचेष्टा वाट्याला येऊनही कविने बाबासाहेबांच्या तत्वज्ञानाशी प्रतारणा केली नाही. आणि सामान्य जनतेशी असलेली तिची बांधिलकीही तोडली नाही. ते चळवळीतील सर्वांनाच पुन्हा पुन्हा आवाहन करीत राहिले.

''या ना रे एकदा
चवदार तळ्याच्या पाण्यावर
ज्याची त्याची खुराडी सोडून
पाणी लाल होईल

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

पाणी निळं होईल

पाणी माणूस होईल.''[३०]

('मी जात आणि बाबासाहेब', 'गल्ली बदलेला मोर्चा', पृष्ठ क्र.९१)

कवीच्या या हाकेमध्ये मानवमुक्तीच्या लढ्याशी असलेली बांधिलकी अजूनही घट्ट आहे. परंतु गेल्या पंचवीस-तीस वर्षामध्ये झपाट्याने वास्तव बदलले आहे. समाजासाठी बाबासाहेबांनी नवी प्रेरणा, नवी शक्ती जरी दिली असली तरी समाजामध्ये फक्त हातात बाबासाहेबांच्या नावाची जपमाळ आहे. मनात मात्र समाजाशी असलेली नाळ तोडण्याचा विचार पक्का आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांपासून प्रेरणा घेऊन लिहिणाऱ्या कवीबरोबर कवयित्रींचाही फार मोठा वाटा आहे. त्यामध्ये हिरा बनसोडे, सुगंधा शेंडे, सुरेखा भगत, प्रज्ञा लोखंडे, उषाकिरण आत्राम, कुसुम अलाम, इत्यादी कवयित्री सातत्याने लेखन करीत आहेत. नव्या सांस्कृतिक मूल्यांची जडणघडण प्रामुख्याने या कवयित्रीनी आपल्या कवितेमधून केले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बौद्ध आविष्कार घडविण्याचे कार्य अर्थात या तिन्ही पिढीतील कवयित्रींनी केलेले आहे.

## २.४ पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या पिढीतील दलित कवयित्री :

### १) हिरा बनसोडे :

कवयित्री हिरा बनसोडे यांचे 'पोर्णिमा' आणि 'फिर्याद' हे दोन काव्यसंग्रह प्रकाशित झाले आहेत. त्या आपल्या काव्यसंग्रहाबद्दल लिहितात, ''पोर्णिमा ही कोवळ्या कळ्यांची सुगंधी बरसात उमलत्या किरणांची सोनेरी मधुर प्रतीची गोड नजाकात, पण या हळव्या स्वप्नाळू भावना म्हणजे मृगजळच'' या मृगजळातून त्या 'फिर्याद' या काव्यसंग्रहामधून बहुतांशी बाहेर पडलेल्या दिसतात.

हिराबाई बनसोडे यांची कविता दलित कवितेत वेगळे स्थान निर्माण करून आहे. त्यांची शब्दांनो या कवितेत त्या शब्दांना जाब विचारतात,

"अरे त्यांच्या अश्रूंच्या महापुरात दिसतोय
मला म्हाडचा रणसंग्राम,
त्यांच्याशेवटच्या श्वासात मला आठवतोय
नाशिकचा ज्वलंत सत्याग्रह
हे सारं घडत असताना तुम्ही बर्फासारखं थंड का ?"[३१]

('शब्दांनो', 'फिर्याद', पृष्ठ क्र.३१)

हिराबाईचा या देशाच्या महान संस्कृतीवर मोठा राग आहे. दलित जग ग्रिष्माच्या उन्हाळ्यात पोळत होते, पण हिने त्यांच्यावर कधी सायसावली धरली नाही. म्हणूनच त्यांनी आपल्या 'फिर्याद' या कवितासंग्रहातून दलितांच्या वेदनांचा आकांत वरील कवितेच्या ओळीमधून अतिशय पोटतिडकीने व्यक्त केला आहे.

**२) सुगंधा शेंडे :**

कवयित्री सुगंधा शेंडे यांचे 'विरतं धुक', 'आम्रपाली भावपल्ली' आणि 'अग्निशिखा' हे तीन काव्यसंग्रह प्रकाशित झाले आहेत. त्यांच्या काव्यामधून देशाला जरी स्वातंत्र्य मिळाले असले तरी या स्वातंत्र्याने मात्र आम्हाला काहीच दिले नाही. ही खंत कवयित्रीने आपल्या काव्यातून प्रथम व्यक्त केली आहे. शिक्षणाची महती सांगताना त्या म्हणतात,

"असो अंगावरी चिंध्या खाईन का कण्याभाकरी
घरातलावीन विद्येची पणती बोल घुमूदे तुझ्या अंतरी"[३२]

('विरत धुकं')

या शब्दांतून कवयित्री 'शिक्षणाची' थोरवी प्रकट करते. जोतीबांनी लावलेली विद्येची ज्योत तेवत ठेवण्याची प्रतिज्ञा ही भगिनी करते. सावित्री फुलेंना ती आदर्श स्त्री मानते.

**३) सुरेखा भगत :**

'साक्ष' हा सुरेखा भगत यांचा काव्यसंग्रह प्रसिद्ध आहे. सभोवतालच्या दुःखाने कवयित्रीचे मन व्याकुळ झालेले आहे. सर्वसामान्य माणसाच्याच जीवनातील भीषण

स्वरुपाचे दु:ख या कवयित्रीने ओळखले असून श्रीमंतीच्या पाऊलखुणाही तिने तपासलेल्या आहेत. एका अर्थाने तेवढ्यासाठी आपली भूमिका पक्की केलेली आहे. ती म्हणते,

''पण त्यात एक माणूस होतो – तो म्हणाला
दु:ख होतंय तर त्याचं निरसन केलंच पाहिजे
गौतम बुद्धाने दु:खावर उपाय सांगितला आहे
लोक दु:खी आहेत म्हणत रडत बसले नाहीत.''[३३]

('साक्ष')

दु:ख ही न संपणारी प्रक्रिया आहे. आणि ते निवारण करण्यासाठी न थांबण्याचा मनोदय तिने व्यक्त केला आहे. या कवयित्रीची प्रेरणास्थाने भक्कम असल्याने तिचा आत्मविश्वास बळावलेला आहे.

**४) प्रज्ञा लोखंडे :**

प्रज्ञा लोखंडे यांचा 'अंत:स्थ' हा काव्यसंग्रह प्रकाशित झाला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची चळवळ आणि त्यांचे तत्त्वज्ञान यांच्यापासूनच प्रेरणा घेऊनच त्यांच्या कवितेची जडणघडण झालेली आहे. फुले आंबेडकरी विचारधारेने दलित कवींना एक नवी मानसिकता दिली. सम्यक परिवर्तनाची दिशा दिली. या दिशेच्या, या मानसिकतेच्या खुणा प्रज्ञा लोखंडे यांच्या 'अत:स्थ' या काव्यसंग्रहामध्ये आढळतात.

कविवर्य कुसुमाग्रज म्हणतात त्याप्रमाणे ''साहित्यप्रेमाचा आणि लेखनाचा वारसा प्रज्ञा लोखंडे यांना घरातच लाभलेला आहे.'' कुसुमाग्रज म्हणतात, त्याप्रमाणे प्रज्ञा लोखंडे यांच्या कवितेत विविध काव्यानुभवांची थरथर नाजूक शैलीतून व्यक्त झालेली आहे. दु:खाची शिल्पे शब्दांतून व्यक्त करण्याची त्यांची रीत चांगली आहे. त्या लिहितात–

''चंद्र हाती यावा
म्हणून नव्हताच हा अट्टाहास
सहज चाळा म्हणून उधाळावेत
हिरवे शकून जखमांवर

आणि टांगून ठेवावीत नजरेसमोर
अधिकच झालेली दु:खाची शिल्पं.....''[३४]

('चंद्र हाती यावा म्हणून', 'अंत:स्थ', पृष्ठ क्र.२)

प्रज्ञा लोखंडे यांची चित्रमय शैली निसर्गाची चित्रे रेखाटते. 'पाऊस चिंब, ओलं रान, हळूच हसतंय भिजलेलं पानं' अशासारख्या ओळी त्या सहज लिहून जातात. या आशयामागे त्यांना जाणवलेला आंबेडकरी विचार आहेत. दया पवार यांच्या लेखनाचा वारसा त्यांच्या मुलीला मिळाला आहे. वर्षानुवर्षे स्त्री दबलेली होती, शोषित होती. पण तिचा आवाज मोकळा झाला आहे. त्याच्या खुणा 'अंत:स्थ' या काव्यसंग्रहामध्ये दिसतात.

**५) उषाकिरण आत्राम :**

उषाकिरण आत्राम यांचा 'म्होरकी' हा कवितासंग्रह १९९७ साली प्रकाशित झालाय. संग्रहाच्या प्रस्तावनेमध्ये कवयित्री लिहितात, ''शिकायची जिद्द मात्र खूप होती, डॉ. बाबासाहेबांचे उदाहरण डोळ्यापुढं असायचं आणि नव बळ, नवी जिद्द, प्रेरणा आपोआप मिळायची'' याच मनोगतात, ''फुले आंबेडकर साहित्याशी स्वत:च नात जुळवूनच माझी लेखनी मी चालवित असते'' असे त्या म्हणतात.

या कवियित्रीला क्रांतीचे महत्व समजलेले असल्यामुळे आपण क्रांतीत उड्या घेतल्या पाहिजेत असे कवयित्रीला अंत:करणापासून वाटत आहे. कवयित्री म्हणते,

''सख्यांनो निर्धार करू या
आपण सावित्री फुले होवू या
रणांगण दुर्गा, झाशाची झलकारी होवू या
आदिमांची शक्ती होवू या
दऱ्याखोऱ्यातील पीडितांची सावली होवू या
दु:खी, कष्टकरी अबलांची साय होवू या
स्त्री अत्याचारांची सखी होऊ या''[३५]

('म्होरकी')

अशी स्त्री सहाय्यतेची आणि एकतेची भावना प्रकट होते. त्यासाठी तिला वाटते आपण हाताचे शस्त्र केले पाहिजे.बुद्धिविचाराचे चक्र फिरविले पाहिजे. दलित चळवळीशी रक्ताचे नाते असलेली कवयित्री आहे. म्हणूनच ती सूर्यनगरींच्या भीमरायाला अंत:करणापासून अभिवादन करते.

**६) कुसुम अलाम :**

'रान असवांचे तळे' हा कुसुम अलाम या आदिवासी भगिनीचा प्रसिद्ध झालेला कवितासंग्रह आहे. दलित साहित्य चळवळीने साहित्याच्या क्षेत्रात मोठी खळबळ उडवून दिली. तशाच प्रकारे आपणही काहीतरी करण्याची जिद्द कुसुम अलाम यांना वाटते. त्यांच्या कवितेत सामुहिक स्वरुपाचे दु:ख व्यक्त होताना दिसते. आपण विद्रोही कवयित्री आहोत. याचा त्यांना गर्व आहे आणि जोपर्यंत विषमता आहे. तोपर्यंत हा विद्रोह विश्रांती घेणार नाही ही त्यांची भूमिका आहे.

या कवयित्रीने आपल्या कवितेमधून आपल्याला गुलामीशी बांधून, आवळून ठेवणारे केवळच गुलाम नाकारायचे नाहीत तर हे लगाम धरणारे हातही तोडायचे आहेत. त्याशिवाय येथे माणसाचा निर्भय समाज आणि माणुसकीचे सुरक्षित पर्यावरण जन्माला घालता येणार नाही. असे तिला वाटते म्हणून झोकोळून गेलेल्या आणि रडायचीही मुभा नसलेली स्त्रीला ही कवयित्री म्हणते,

> ''सुर्याचे तेज तर तुझ्या अंतरंगात आहे
> घे शपथ या विशाल गगनाची
> हे जग मी सुंदर करून जाणार आहे''[३६]
>
> ('रान आसवांचे तळे')

अशा प्रकारची शपथ अंधाऱ्या कोठडीत बंद असलेल्या आणि रडायचीही मुभा नसलेल्या स्त्रीला ती घ्यायला सांगते. यातून कवयित्रीच्या भगिनींच्याकडे पाहण्याचा विशाल दृष्टिकोण प्रकट होतो.

## २.५ दलित कवितेसंदर्भातील विविध मते :

अति प्राचीन काळापासून मराठी कवितेचा प्रवाह अखंड स्वरुपात वहातच आहे. ''मराठी कवितेला एक भक्कम पारंपरिक रंग आहे. त्या रंगात कल्पनेतून निर्माण होणारे साहित्य चमकदार पद्धतीने यमकप्रासीच्या सहाय्याने निर्माण होत असे. परंतु हा मराठी कवितेचा साचा बदलण्याचे कार्य दलित कवितेने केले.''[३७] असे केशव मेश्राम म्हणतात. दलित कविता ही मूळ मराठी कवितेच्या प्रवाहापेक्षा वेगळी आहे. असाच त्यांच्या म्हणण्याचा अर्थ आहे.

दलित कवितेचे निराळेपण कशात आहे ? तिची निर्मिती मुद्दाम, हेतुपूर्वक करण्यात आली का ? तरतसे कांही नाही. नव्याने शिक्षित झालेल्या दलिततरुणांना आंबेडकरांच्या प्रेरणेने उत्स्फुर्तपणेच लिहावेसे वाटले. दया पवार स्पष्टच म्हणतात की, ''कविता लिहिण्यापूर्वी तशी कोणतीही भूमिका मनात नसते एवढेच काय कविता घडणार आहे. याची पुसटशी जाणीवही नसते. एक मात्र खरे की एखादी घटना एखादे वाक्य किंवा दैनंदिन घटनातील कार्यकारणभाव यातून मला कविता सुचते.''[३८] बहुसंख्य दलित कवींना आपल्या जीवनातील दाहक अनुभव, अपमानित करणारी घटना, समजाकडून मिळालेली अन्यायकारक वागणूक यामुळेच कविता लिहाविशी वाटली आणि त्यांनी ती लिहिली आहे.

''ज्यावेळी दलितांना पुरातन काळापासूनच्या प्रखर पारतंत्र्याची कल्पना आली आणि त्या पारतंत्र्याचा निःपात करण्याची अनावर अशी न्याय आकांक्षा स्फुरली त्यावेळी पहिला उद्‌गार काव्यातून उमटला''[३९] अशा शब्दात दलित कवितेच्या निर्मितीची कारणमीमांसा ज्येष्ठ समीक्षक रा.ग.जाधव यांनी केली आहे. या कवितेने स्वातंत्र्यासाठी लढण्यास हाक दिली. पारतंत्र्यातील जीण्याचे भयावह वास्तव रुप दाखविले. सनातन प्रवृत्तीचा निषेध केला. मराठी मनाला अस्वस्थ केले. वास्तवदर्शी आत्मानुभवाचे चित्रण करून मराठी साहित्यात एक वेगळे आव्हान उभे केले.

डॉ. सदा कऱ्हाडे यांच्या मते, ''कोणत्याही वेदनेचा पहिला हुंकार काव्यरुपच धारण करतो. म्हणूनच दलित साहित्यिकांनी काव्य हा वाङ्मयप्रकार निवडला. उरात ठसठसणारी

वेदना कवितेतून आविष्कृत केली..... दलित साहित्यिकांनी दलितांचे समाज प्रबोधन व समाज परिवर्तन घडविण्यासाठी दलित कवितांचा वापर मोठ्या प्रमाणात केला आहे.''[४०] कऱ्हाडे यांचे हे मत सहज मान्य होणारे आहे. दलित कविता आपले दु:ख आणि चीड व्यक्त करण्यासाठीच जन्मली आहे. ती आंबेडकरी चळवळीतून फोफावली सुद्धा आहे.

''दलित कवींची संवेदनशीलता ही त्या कवीच्या आत्मानुभूतीच्या खोल व भरभक्कम पायावर उभी आहे. प्रतिभेच्या सहाय्याने निर्माण केलेल्या स्वप्नरंजित कल्पनारम्य अशा जगाशी तिचे नाते नाही. म्हणून दलित कविता परंपरेला नाकारणारी आहे. स्वातंत्र्य, समता, बंधुताआणि न्याय या मागदर्शक तत्त्वांची हमी देणाऱ्या बुद्ध विचारसारणीवर श्रद्धा ठेवणारी, दीन दुबळ्या,गोरगरीब समाजाचा उद्धार याच मार्गाने आल्याशिवाय राहणार नाही अशी अंतरी खूणगाठ बांधणारी कविता आहे.''[४१] असे मत हरीश खंडेराव यांनी व्यक्त केले आहे.

'दलित साहित्यात व्यक्त झालेले अनुभव त्या समुहाचे असतात. त्या अनुभवांचे स्वरुप केवळ व्यक्तिमनानी निश्चित झालेले नाही तर समाजगटाच्या वाट्याला आलेल्या जीवनपद्धतीने नियमित झालेले आहे.'[४२] असे मत प्रभाकर मांडेनी व्यक्त केले आहे. दलित कवितेचा उगम उत्कट संघभावनेतून आणि आंबेडकरांच्या विचारातून झालेला आहे.

कवी लोकनाथ यशवंत हे तिसऱ्या पिढीचे प्रतिनिधीत्व करणारे कवी आहेत. त्यांचे 'आता होऊन जाऊ द्या !' (१ जानेवारी, १९८९) व 'आणि शेवटी काय झाले ?' (१ जानेवारी, १९९५) हे दोन काव्यसंग्रह प्रकाशित झाले आहेत. त्यांनी ज्यावेळेस काव्यलेखन केले त्यावेळेस महाराष्ट्रामध्ये अनेक घडामोडी घडल्या. त्याचा परिणाम त्यांच्या कवितेवर झालेला दिसून येतो.

कवी लोकनाथ यशवंत यांनी आपला विद्रोह अतिशय धीराने शांत, संयमीपणाने व्यक्त केला आहे. त्यांच्या या दोन्ही काव्यसंग्रहाच्या शीर्षकातच निर्णायक संघर्ष करण्याचे सुस्पष्ट आव्हान आहे. लोकनाथ यशवंत यांचा संघर्ष, स्वत्व, माणूसपण, सामाजिक प्रतिष्ठा आणि समता त्या मूल्यांच्या बाजूने आणि विषमता जोपासणाऱ्या पारंपरिक व्यवस्थेच्या विरोधात आहे.

लोकनाथ यशवंत यांच्या कवितेविषयी लिहिताना किशोर सानप लिहितात, ''ढसाळांसारखी प्रचंड आशयानुभव असलेली स्फोटक कविता नंतरच्या दलित कवींमध्ये सहसा कोणी लिहिलेली नाहीत. ढसाळांनंतरची तिसरी पिढीमात्र, कवितेचा गांभीर्याने विचार करतांना दिसून येते. असा विचार करणारे जे बोटावर मोजता येतील असे कवी आहेत, त्यात लोकनाथ यशवंत हा जबरदस्त ताकदीचा कवी आहे.''[४३]

दलित कवितेच्या प्रांतामध्ये कवी लोकनाथ यशवंत यांची कविता संयमशीलता, स्त्रीमनाचा सूक्ष्म वेध घेण्याची क्षमता या गुणामुळे उठून दिसते. पुढे जाऊन किशोर सानप म्हणतात, ''त्यांची कविता सरळ 'आक्रमण' करून सामान्य माणसाच्या 'मेंदूत' परिवर्तनाची आणि सांस्कृतिक संक्रमणाची 'सळसळ' निर्माण करणारी आहे. म्हणूनच नामदेव ढसाळापासून सरळच धावत दलित कविता लोकनाथ जवळ येऊन पोहोचली''[४४] असे ते सांगतात.

सामाजिक बांधिलकीच्या सर्व शोकांतिका डोळ्यात एकवटून हा कवी वाटचाल करतो आहे. या वाटचालीत एक एक शोकात्मक कथा हेलावून टाकणाऱ्या अखेरपर्यंत खरेखोटेपणाचा निर्णयच लावता येणार नाही अशा स्वरुपाच्या आहेत. ह्या शोकात्मक कथांकडे तटस्थपणे पाहत 'पाण्याच्या बुडबुड्यावर' उभेराहून अनुत्तरीत प्रश्नाचा शोध घेण्याचा प्रयत्न लोकनाथ यशवंत करीत आहे.

त्यांच्या दोन्ही काव्यसंग्रहांचा सविस्तर अभ्यास या पुढील दोन प्रकरणात मांडणार आहे. तिसऱ्या पिढीतील दलित कवींचे प्रतिनिधीत्व लोकनाथ यशवंताची कविता करते. एवढेच येथे नमूद करते.

एकंदरीत पहिल्या पिढीमधील सर्वच कवी आंबेडकरांनी जाणवून दिलेल्या प्रखर जाणिवेने पटलेले कवी आहेत. पूर्वायुष्यात त्यांच्यावर झालेले अन्याय त्यांना अस्वस्थ करतात. त्याच जाणिवेचा आविष्कार त्यांच्या कवितेतून प्रकट झाला आहे. पहिल्या पिढीतील सर्वच कवींच्या कवितेत वेदना, विद्रोह, नकार आलेला आहे. तथापि, त्यामागे

असणारे प्रबोधनाचे सूत्रही आपणाला जाणवतेच. ती स्वत:चा वेगळा ठसा उमटवित रसिकांना सामोरी आली.

दुसऱ्या पिढीतील दलित कवींची कविता अधिक तीव्र स्वरुपात विद्रोहाची प्रेरणा देते. त्यांच्याही कवितेत दु:ख यातनेचा आविष्कार आलेला आहे. डॉ. आंबेडकर, म. फुले, व गौतमबुद्ध, कार्लमार्क्स, इत्यादींचा प्रभाव दुसऱ्या पिढीतील कवींच्यावर झालेला दिसतो. आपणास काही निवडक कवी/कवयित्रींच्या लेखनातून दिसते. त्यांनी आपल्या लेखनातूनच दलित समाजाचे प्रबोधन केलेच परंतु त्यांच्यातील स्वत्व जागवले.

दलितांच्या प्रश्नाकडे कोणत्याही राजकीय (दलित) नेत्याने गांभीर्याने लक्ष दिले नाही. दलितांच्या सामाजिक स्थितीत कोणताच फरक पडला नाही. त्यांच्यात सुधारणाऐवजी दलित माणसाची व दलित चळवळीची दशा झाली. त्याचे भेदक चित्र दलित कवितेत येताना दिसते. यामध्ये नामदेव ढसाळ, केशव मेश्राम, त्र्यंबक सपकाळे, प्रल्हाद चेंदवणकर, प्रज्ञा लोखंडे इत्यादी कवीनी ह्या चळवळीच्या सद्य स्थितीवर फारच भेदक लिहिलेले आहे. याशिवाय नवकवितेच्यांमध्ये लोकनाथ यशवंत, शरणकुमार लिंबाळे, श्री प्रकाश मोगले, अशोक पाटील इत्यादी कवींच्या कवितेत दलित चळवळीविषयी अत्यंत मार्मिक विवेचन आले आहे. या सर्वांच्या कवितेतून दलित चळवळीची दशा काय आहे, किंवा तिची दशा कशी झाली आहे याची भेदक व जळजळीत चित्र स्पष्ट होते.

विसाव्या शतकातील अखेरच्या पावशतकात झालेल्या सामाजिक आणि राजकीय उलथापालथींचा मोठा परिणाम हा तिसऱ्या पिढीतील दलित कवींच्यावर झालेला आहे. या दशकता उदयाला आलेल्या कवींनी दलित कवितेला नवे वळण नवे आयाम देण्याचा प्रयत्न केला आहे,. पूर्वसुरींच्या कवितेपेक्षा अभिव्यक्तीच्या नव्या वाटा चोखळणाऱ्या या कविता आहेत. दलित कविता म्हणून या तिसऱ्या पिढीची कविता श्रेष्ठ आहेच, परंतु मराठी कवितेच्या मुख्य धारेत मध्यवर्ती स्थान मिळावे एवढे सामर्थ्य या पिढीच्या कवितेत आहे.

दलितांची दु:खे आज शतकानुशतके चालत आलेली आहेत. कायद्याने अस्पृश्यता नष्ट झालेली असली तरी आजही सामाजिक वास्तवामध्ये बदल झालेले नाही. ही वास्तवाची

प्रखर जाणीव या पिढीतील कवींना झालेली आहे. त्याचे वेगवेगळे आविष्कार नव्या प्रवाहातील कवींच्या कवितेत आपणास दिसून येतात. खेड्यापाड्यातील दलितांना आजही पशुपातळीवरचे जीवन सक्तीने जगावे लागते. परंतु आज दलितांमधील सुशिक्षित झालेल्या तरुणाला आपल्यावर होणाऱ्या अन्यायची प्रखर आत्मजाणीव झालेली आहे, त्यांचे मन संवेदनशील आणि आंबेडकरी विचाराचे प्रगत झालेले असल्याने त्यांची कविता मराठी कवितेत फार मोठी क्रांती घडवित आहे. तिचे लक्षणीय रुप म्हणजे तिसऱ्या पिढीतील कविता होय.

## २.६ निष्कर्ष :

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या दलित समाजातील माणसांना अन्याय अत्याचाराविरूध्द लढण्यास शिकवले. शिक्षणाचे महत्त्व पटवून देऊन अज्ञानरूपी अंध:कार नाहिसा करण्याची प्रेरणा दिली. समाजामध्ये आपण परंपरागत रूढी सांभाळत असताना पूर्वायुष्यात जे अन्याय सोसले जे अत्याचार भोगले त्याविषयीचे दु:ख आणि संताप कवी कवितेच्या माध्यमातून व्यक्त करू लागले. ती पहिल्या पिढीची दलित कविता आहे.

२) त्याप्रमाणेच नारायण सुर्वे नामदेव ढसाळ, दया पवार, केशव मेश्राम, वामन निंबाळकर या सर्व कवींनी पहिल्या पिढीमध्ये काव्यलेखन केलेले दिसते. सुर्वे यांची कविता म्हणजे वास्तवांची प्राणकहाणी आणि थकल्याभागल्या श्रमकऱ्यांची भावकथा आहे. कामगार आणि दलित जीवनाचा प्रत्यक्ष अनुभव घेतल्यामुळे त्यांच्या कवितेतून सामाजिक क्रांतीचा उद्घोष आढळतो.

३) नामदेव ढसाळ यांची कविता ही प्रस्थापित मूल्यांचा विध्वंस करणारी कविता आहे. दलित समाजावर नित्यनेमाने होणारे अत्याचार आणि अन्याय पाहून व्यथित होणारा आणि समाजाच्या विकासासाठी असुसलेले कवी दया पवार हे आहेत. 'माणूस' केंद्र आणि माणसाचे जीवन हा संदर्भ मानणारी कवी मेश्रमांची कविता आहे.

४) दुसऱ्या पिढीतील दलित कवीची कविता प्रबोधन घडविते. डॉ. आंबेडकरांनी, म.फुले व गौतम बुध्दांनी कार्लमार्क्सने काय सांगितले व शिकवले यांचा विचार करून त्यानुरोधाने समाजाला विकासासाठी मार्गदर्शन करते. प्रल्हाद चेंदवणकर, त्र्यंबक सपकाळे, अर्जुन डांगळे, यशवंत मनोहर, बळवंत कांबळे या सर्व कवींनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विधायक कार्याचा व विचार प्रणालीचा आणि बुध्दाच्या तत्वविचाराचा पुनरूच्चार करणारी ही दुसऱ्या पिढीतील कवितेची एक प्रेरक शक्ती आहे. या सर्व कवींनी पहिल्या पिढीच्या ज्ञानानंतर प्रत्यक्षात काय घडले आणि काय घडणे अपेक्षित होते याचा शोध घेऊन अधिक आक्रमक आणि विद्रोही होण्याचे आवाहन समाजाला केलेले दिसते.

५) तिसऱ्या पिढीतील कवींनी दलित कवितेला एक वेगळा आकार देण्याचा प्रयत्न केला आहे. पूर्वसुरींच्या कवितेपेक्षा अभिव्यक्तीच्या नव्या वाटा चोखळणाऱ्या या पिढीची कविता श्रेष्ठ आहे. समकालीन दलित कवितेत वाहरू सोनवणे, अरूण काळे,दीपक त्रिभुवन, लहु कानडे, राम दोतोंडे इत्यादी कवींनी काव्यलेखन केलेले आहे. अरूण काळे यांच्या कवितेमध्ये चिंतनाचे तेजही अधिक आहे. लहु कानडे यांनी 'क्रांतीपर्व' आणि 'टाचटिभा' या दोन काव्यसंग्रहातून अस्पृश्यतेचा दाहक अनुभव मांडला आहे. तर राम दोतोंडे त्यांच्या काव्यसंग्रहाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी दलित चळवळीला एका नव्या जाणिवेची ओळख करून दिली आहे.

६) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांपासून प्रेरणा घेऊन लिहिणाऱ्या कवीबरोबर कवयित्रीचांही फार मोठा वाटा आहे. हिरा बनसोडे, सुगंधा शेंडे, सुरेखा भगत, प्रज्ञा लोखंडे, उषाकिरण आत्राम, कुसुम आलाम इत्यादी कवयित्री सातत्याने काव्यलेखन करीत आहेत. तसेच दलित कवितेसंदर्भात समीक्षकांनी विविध मते मांडली आहेत.

७) अतिप्राचीन काळापासून मराठी कवितेचा प्रवाह अखंड स्वरूपात वाहतच आहे. दया पवार दलित कवितेविषयी स्पष्टच म्हणतात की, बहुसंख्य दलित कवींना आपल्या जीवनातीलन दाहक अनुभव, अपमानित करणारी घटना समाजाकडून

मिळालेली अन्यायकारक वागणूक, यामुळेच कविता लिहावीशी वाटली आणि त्यांनी ती लिहिली आहे.

८) ज्येष्ठ समीक्षक रा.ग.जाधव यांच्या मते दलित कवीनी आपल्या कवितेतून लढण्यास हाक दिली. आपल्या कवितेतून वास्तवदर्शी आत्मानुभवाचे चित्रण करून मराठी साहित्यात एक वेगळे आव्हान उभे केले आहे.

९) डॉ. सदा कऱ्हाडे यांच्या मते दलित कविता आपले दु:ख आणि चीड व्यक्त करणयासाठीच जन्मली आहे. ती आंबेडकरी चळवळीतून फोफावलेली सुध्दा आहे.

१०) कवी लोकनाथ यशवंत हे तिसऱ्या पिढीतील अत्यंत महत्त्वाचे आणि जबरदस्त ताकदीचे कवी आहेत त्यांनी आपला विद्रोह अतिशय धीराने शांत संयमीपणाने व्यक्त केला आहे. तथापि निर्णायक लढयाचे त्यांच्या कवितेतील आव्हान त्यांच्या कवितेच्या शीर्षकापासूनच सुरू होते.

११) लोकनाथ यशवतांचा संघर्ष स्वत्त्व, माणूसपण, सामाजिक प्रतिष्ठा आणि समता या मूल्यांच्या बाजूने आहे तसाच तो परंपरा जपणाऱ्या समाजव्यवस्थेच्या विरोधातही आहे.

१२) लोकनाथ यशवंताची कविता संयमशीलता आणि स्त्रीमनाचा सुक्ष्मवेध या गुणांच्यामुळे अधिक उठून दिसते. सामाजिक बांधिलकीच्या सर्व शोकांतिका एकवटूनच हा कवी वाटचाल करीत आहे.

१३) कवी लोकनाथ यशवंत आणि त्यांच्याबरोबरचे समकालीन कवी मराठी कवींच्या प्रांतात फार मोठे बदल घडवितआहेत असे नि:संशयीपणाने दिसते. मराठी कवितेच्या मुख्य धारेमध्ये मध्यवर्ती स्थान मिळविण्या इतपत त्यांची कविता श्रेष्ठ आहे.

-----

## संदर्भ सूची


१) सुर्वे नारायण : 'चार शब्द', 'ऐसा गा मी ब्रह्म !', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, प्रथम आवृत्ती, १९७१, पृष्ठ क्र.१३.

२) तत्रैव : 'दोन दिवस', पृष्ठ क्र.५३.

३) कुरुंदकर नरहर : 'पायवाट', प्रथम आवृत्ती, १९७४, पृष्ठ क्र.१२४.

४) तेंडूलकर विजय : 'गोलपिठा', प्रस्तावना, ढसाळ नामदेव, निलकंठ प्रकाशन, पुणे-३०, द्वितीय आवृत्ती,१९७५, पृष्ठ क्र.८,९.

५) ढसाळ नामदेव : 'गोलपिठा', नीलकंठ प्रकाशन, पुणे-३०, द्वितीय आवृत्ती, १९७५, पृष्ठ क्र.५.

६) तत्रैव : 'डॉ. आंबेडकर', पृष्ठ क्र.५०.

७) जाधव रा.ग. : 'निळी पहाट', श्री विद्या प्रकाशन, पुणे-३०, द्वितीय आवृत्ती, १९८९, पृष्ठ क्र. ११८.

८) पवार दया : 'कोंडवाडा', 'कोंडवाडा', सिद्धार्थनगर, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, तृतीय आवृत्ती, १९९४, पृष्ठ क्र.४४.

९) मेश्राम केशव : 'गर्दीतल्या भेटीगाठी', 'उत्खनन', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, पहिली आवृत्ती, १९७७, पृष्ठ क्र.१४.

१०) तत्रैव : 'एक दिवस मी परमेश्वरला', पृष्ठ क्र.७४.

११) निंबाळकर वामन : 'शब्दप्रभूनों', 'गावकुसाबाहेरील कविता', प्रबोधन प्रकाशन, नागपूर, द्वितीय आवृत्ती, १९८९, पृष्ठ क्र.२.

१२) ताकसांडे प्रसेनजित : 'सामुदायिक दारुण अनुभव', गावकुसाबाहेरील कविता: अस्वाद आणि समीक्षा, सुगाव प्रकाशन, पुणे, तृतीय आवृत्ती, १९९०, मधून उद्धृत, पृष्ठ क्र.७३.

१३) चेंदवणकर प्रल्हाद : 'एक कप चहाचा', 'ऑडिट', अभिनव प्रकाशन, मुंबई,प्रथम आवृत्ती, १९९६, पृष्ठ क्र.२४.

१४) फडके भालचंद्र : 'दलित सहित्य वेदना व विद्रोह', श्री विद्या प्रकाशन, पुणे-३०, प्रथम आवृत्ती, १९७८, पृष्ठ क्र.१५९.

१५) सपकाळे त्र्यंबक : 'बाराखडी', 'सुरुंग', अस्मितार्थ प्रकाशन, प्रथम आवृत्ती, १९७६, पृष्ठ क्र.३६.

१६) डांगळे अर्जुन : 'मी निघालोय', 'छावणी हलते आहे', कर्मवीर प्रकाशन, मुंबई, प्रथम आवृत्ती, १९७७, पृष्ठ क्र. ९२.

१७) तत्रैव : 'कोडे', पृष्ठ क्र. २६.

१८) तत्रैव : 'युगधर्म', पृष्ठ क्र. १०.

१९) मनोहर यशवंत : 'वैरी', 'उत्थानगुंफा', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयानगर, पुणे-३०, द्वितीय आवृत्ती, १९८०, पृष्ठ क्र.१५.

२०) भोळे भा.ल. : 'दलित कवितेची उत्थानगुंफा', समाज प्रबोधन पत्रिका, मे/जून, १९७६, पृष्ठ क्र. २००.

२१) कांबळे बळवंत : 'निषेध', 'निषेध', प्रथम आवृत्ती, १९८१, पृष्ठ क्र.१२.

२२) तत्रैव : 'संशोधन', पृष्ठ क्र.७.

२३) इनामदार हेमंत : 'पुरस्कार', 'दलित कविता एक दर्शन', ललिता कुंभोजकर, प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, १९८४, पृष्ठ क्र.१६.

२४) भवरे महेंद्र : 'दलित कवितेतील नवे प्रवाह', शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, प्रथम आवृत्ती, २००१, पृष्ठ क्र. ११.

२५) सोनवणे वाहरु : 'गोधड', रविराज प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, १९८७, पृष्ठ क्र. ४७.

२६) काळे अरूण : 'सायरनचे शहर', सत्यजित प्रकाशन, नाशिक, प्रथम आवृत्ती, १९९७, पृष्ठ क्र. ६४.

२७) त्रिभूवन दीपक : 'खोल खदानी', मधुश्री प्रकाशन,पुणे, प्रथम आवृत्ती, १९९२.

२८) कानडे लहू : 'टाचाटिभा', सुगावा प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, २००१, पृष्ठ क्र. १४.

२९) दोतोंडे राम : 'मी जात आणि ते', 'गल्ली बदललेला मोर्चा', सुगावा प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, २००१, पृष्ठ क्र.८७.

३०) तत्रैव : 'मी जात आणि बाबासाहेब', पृष्ठ क्र.९१.

३१) बनसोडे हिरा : 'शब्दांनो', 'फिर्याद', समाज प्रबोधन संस्था, प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, १९८४, पृष्ठ क्र.३१.

३२) शेंडे सुगंधा : 'विरंत धुक', 'खेमराज हिरेखाण', नागपूर, प्रथम आवृत्ती, १९७०.

३३) भगत सुरेखा : 'साक्ष', सिंहगर्जना दिवाळी अंक, १९८०.

३४) लोखंडे प्रज्ञा : 'चंद्र हाती यावा म्हणून', 'अंतःस्थ', मानसन्मान प्रकाशन, पुणे-४, प्रथम आवृत्ती, १९९३, पृष्ठ क्र.२.

३५) आत्राम उषाकिरण : 'म्होरकी', 'आंबेडकरवादी मराठी साहित्य' : डॉ. यशवंत मनोहर, भीमरत्न प्रकाशन, नागपूर, प्रथम आवृत्ती, १९९१, पृष्ठ क्र.१९५ मधून उद्धृत.

३६) अलाम कुसुम : 'रान आसवांचे तळे', (१९९८), आंबेडकरी कवितेचे अंतरंग, हरीश खंडेराव, जागर प्रकाशन, मुंबई, प्रथम आवृत्ती १९८१, पृष्ठ क्र.२०० वरून उद्धृत.

३७) मेश्राम केशव : 'दलित कवितेचे वेगळेपण', लोकमत (साहित्य जत्रा), दि. २८.१.७९.

३८) पवार दया : 'कोंडवाडा', (मनोगत), महता पब्लिशिंग हाऊस, पुणे, तृतीय आवृत्ती, १९९४.

३९) जाधव रा.ग. : 'निळी पहाट', श्री विद्या प्रकाशन, पुणे-३०, द्वितीय आवृत्ती, १९८९, पृष्ठ क्र.३७.

४०) कऱ्हाडे स.दा. : 'साहित्य विश्लेष', स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती, १९९९, पृष्ठ क्र.८६.

४१) खंडेराव हरीश : 'आंबेडकरी कवितेचे अंतरंग', प्रास्ताविक, जागर प्रकाशन, मुंबई-६२, प्रथम आवृत्ती, १९८१, पृष्ठ क्र.१९.

४२) मांडे प्रभाकर : 'मराठी वाङ्मयातील नवीन प्रवाह', संपा. शरणकुमार लिंबाळे, लेख 'दलित साहित्य', मधुराज पब्लिकेशन, पुणे, १९९३, पृष्ठ क्र.६६.

४३) सानप किशोर : 'कविता-रती', मार्च-एप्रिल, १९९१, पृष्ठ क्र.३०.

४४) तत्रैव, : पृष्ठ क्र. ३०.

-----